सोपे
लहान मुलांसाठी

11911

घटक 1

वीर विश्वासाचे

रविवार शाळा

# विश्वासाचे वीर - रविवार शाळा

घटक 1


विद्यार्थ्यांचे पुस्तक

## विशेष संस्करण



# स्वागत...

...ह्या अभ्यासात आपण इब्री लोकांस पत्र 11 मध्ये असलेले विश्वासाचे शूरवीर ह्यांची एक यादी पाहणार आहोत त्या अभ्यासात तुमचे स्वागत आहे. आणि आपण शिकणार आहोत कि आपण एक विश्वासाचे जीवन कशा प्रकारे जगू शकतो, कारण आपले आध्यात्मिक जीवन आपल्या शारीरिक जीवनापेक्षा अधिक महत्वाचे आहे.




आपण जुन्या करारातील अशा पुरुष व स्त्रियांबद्दल पाहणार आहोत ज्यांनी देवावर विश्वास ठेवला, जे देवाशी बोलले आणि जे त्याच्या साठी जगले. ते आपल्या साठी एक उदारहण आहेत. कधी कधी आपण लोकांनी केलेल्या चांगल्या गोष्टींपासून काही तरी शिकतो आणि इतर वेळेस आपण त्यांच्या चुकांनपासून शिकतो.

कारण आपण देवावर विश्वास ठेवण्याबद्दल बोलत आहोत, म्हणून आपण त्याचा अर्थ स्पष्ट करून सुरुवात करूया. तुम्हाला माहित आहे का कि विश्वास काय आहे? हा अभ्यास ज्या मुख्य वचनावर आधारित आहे ते आहे, इब्री लोकास पत्र 11:1.

## पाठांतर वचन

“विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टीविषयींचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.” इब्री लोकांस पत्र 11:1.

पवित्र शास्त्र हे ख्रिस्ती लोकांसाठी एक फार महत्वाचे पुस्तक आहे, पण हे एक मोठे पुस्तक आहे. तुमच्या पैकी किती लोकांनी संपूर्ण शास्त्र वाचलं आहे? ते इतकं मोठं आहे कि आपण हरवू शकतो आणि घडलेल्या गोष्टींबद्दल गोंधळू शकतो, हे माहित नसतांना कि ते कुठे आणि केव्हा झाले. ह्यात तुमची मदत करण्यासाठी आपण इब्री लोकांस पत्र 11 ह्यातील गोष्टींसोबत जुन्या करारांचे पुनरावलोकन करणार आहोत. आपण हे सर्व आपल्या आध्यात्मिक जीवनात लागू करणार आहोत. आपण जुन्या करारांतील पुस्तकांची आणि मुख्य सेवकांची नावे धडा करणार आहोत, ज्यांना एका ऐतिहासिक क्रमात ठेवले आहे ह्यासाठी कि आपण तारखा आणि घटनांनी गोंधळू नये. जुन्या कराराचा अभ्यास करणे का महत्वाचे आहे ह्याचे मुख्य कारण आहे कि आपल्याला अद्भुत गोष्टी आणि आपण आज आपल्या जीवनात प्रत्यक्षात लागू करू शकतो अशा सूचना प्राप्त होतील.

धडा 1

# देवावर विश्वास ठेवा

**निर्मिती: उत्पत्ति 1:1-2:3, इब्री 11:1-3**

## पाठांतर वचन

“विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.” इब्री लोकांस पत्र 11:1

लपवलेल्या 6 गोष्टी शोधा.
मग, चित्र रंगवा



## कार्य

हया आठवडी तुमचे कार्य हे असेले कि देवाने निर्मीतीच्या आठवडयात जे काही केले त्याची सेल्फी घेणे किंवा त्याचे साधे चित्र काढणे.

सोमवारः सेल्फी/चित्र दिवसा किंवा रात्री

मंगळवारः सेल्फी/चित्र आकाश दाखविणारे आणि दुसरे शक्य असल्यास समुद्र, तलाव किंवा नदी दाखविणारे

बुधवारः सेल्फी/चित्र झाडं व वनस्पती दाखविणारे

गुरूवारः सेल्फी/चित्र सूर्य आणि दुसरे चंद्र किंवा तारे दाखविणारे

शुक्रवारः सेल्फी/चित्र मासे आणि शक्य असल्यास एखादा पक्षी दाखविणारे

शनिवारः सेल्फी/चित्र प्राणी व लोकांचे

रविवारः तुमच्या गृहपाठापासून सुट्टी घ्या

# धडा 2 त्याला तुमचे हृदय द्या

**हाबेल: उत्पत्ति 4:1-16, इब्री 11:4**

## पाठांतर वचन

“आणि ‘तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने प्रीती कर.” मार्क 12:30

लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा





## कार्य

हया आठवडी तुमचे कार्य हे असेल कि तुमच्या मनापासून काही तरी दया· पवित्र शास्त्र सांगतं कि आपण इतरांसाठी जे काही करतो ते आपण येशूसाठी करतो (मत्तय 25:40) म्हणून कोणालातरी मदत करण्याची संधी शोधा किंवा ज्यांना कशाची तरी गरज आहे त्यांना ते दया· तुमच्या आईवडीलांकडून परवांगी जरूर घ्या· धोकादायक अशी कोणतीच गोष्ट करू नका· तुम्हाला काही तरी परत मिळेल हया आशेने देवू नका·




# देवाला संतोषवा


**हनोख: उत्पत्ति 5:21-24, इब्री 11:5-6**

## पाठांतर वचन

“येशूने त्याला उत्तर दिले, “ज्याची माझ्यावर प्रीती असेल तो माझे वचन पाळील, माझा पिता त्याच्यावर प्रीती करील आणि आम्ही त्याच्याकडे येऊन त्याच्याबरोबर वस्ती करू.." योहान 14:23



लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा



## कार्य

हया आठवडी तुमचे कार्य म्हणजे नविन करारातील काही गोष्टी वाचाव्या आणि येशू तुमच्या बरोबर चालत आहे हे पहावे. ज्यावेळेस त्याने तुमची मदत केली त्याबद्दल लिहा किंवा तुम्ही त्याला मागीतले म्हणून त्याने इतर कोणाची तरी मदत केली. कधी कधी तो आपल्याला कल्पना किंवा विचार देतो, म्हणून तुम्ही येशूने तुम्हाला दिलेल्या कल्पना लिहून काढा. आणि तुमच्या शिक्षकाबरोबर खात्री करा कि हया कल्पना पवित्र शास्त्राशी सुसंगत आहेत का.

# धडा 4


# देवाची आज्ञा पाळा

**नोहा: उत्पत्ति 6:9-9:17, इब्री 11:7**

## पाठांतर वचन

“वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका; अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता.” याकोबाचे पत्र 1:22

लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा





## कार्य

तुमचा गृहपाठ हा आहे की तुम्ही अशा एक किंवा जास्त गोष्टी लिहा ज्या तुम्ही करू नयेत असे देवाला वाटते आणि त्या करण्याचा तुम्हाला मोह झाला तेव्हा तसे करण्याऐवजी तुम्ही देवाच्या मागे जाणे ठरविले.

# धडा 5 परीक्षा पास करा


**अब्राहाम: उत्पत्ति 12:1-7, 15:1-6, 21:1-3, 22:1-19, इब्री 11:8-19**

## पाठांतर वचन

“तू त्यांना झग्यासारखे - वस्त्रासारखे गुंडाळशील, आणि ती बदलली जातील; परंतु तू तसाच राहतोस, तुझी वर्षे संपणार नाहीत.” याकोबाचे पत्र 1:12



लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा



## कार्य

या आठवडयातील तुमचे कार्य आहे की तुमची स्वप्ने लिहावीत, अशा गोष्टी ज्या तुमच्या जीवनात कराल अशी तुमची आशा आहे. त्या तुमच्या आवडत्या गोष्टी असतील, जसे की अंतराळवीर होणे, पट्टीचे पोहोणारे, सैनिक, डॉक्टर, व्यवसाय मालक. मोठे स्वप्न पाहा - तुमचा देव मोठा आहे. आणि मग देवाला मागा की त्याच्यासाठी तुम्ही काय सोडून द्यावे, तुमच्या शिक्षकांकडून त्याची तपासणी करा आणि मग या आठवडयात तसे करा


धडा 6


# आध्यात्मिक गोष्टींना किंमत द्या

**इसहाक: उत्पत्ति 25:19-34, 27:1-40, इब्री 11:20**

## पाठांतर वचन

“कारण मनुष्याने सर्व जग मिळवले आणि आपल्या जिवाचा नाश करून घेतला तर त्याला काय लाभ?” मार्क 8:36

लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा 



## कार्य

या आठवडयासाठी तुमचा गुहपाठ आहे तुमच्या जन्महक्काबाबत लिहीणे, तुम्ही जे जीवन जगणार आहात त्याबाबत लिहीणे. प्रथम, तुमचा जन्महक्क काहीच नाही असे समजू नका. तो फार मोलाचा आहे. कदाचित मॅकॅनिक किंवा इंजिनियर किंवा नर्स असेल. तुमच्या शेजा-यांमध्ये किंवा तुमच्या देशामध्ये तुम्ही फरक करू शकता. परंतु तुमच्या आध्यात्मिक जन्महक्का बाबत हि लिहा. तुम्ही देवाचे मुल आहात आणि त्याच्या पराक्रमी कुटूंबामध्ये आहात. देवाने तुम्हाला वेगवेगळी कौशल्ये आणि इच्छा दिलेल्या आहेत, आणि आध्यात्मिक कुटूंबात यशस्वी होण्यासाठी तो त्यांचा उपयोग करून घेईल. तुम्ही हे तुमच्या शिक्षकांना दाखवू शकाल, परंतु दाखवलेच पाहिजे असे काही नाही. देवासाठी तुमचे हृदय मुल्यवान आहे.

## धडा 7

# देवाचा आशीर्वाद


**याकोब: उत्पत्ति 27:41-28:2, 28:10-15, 28:20-22, 31:3-13, 31:22-24, 32:9-12, 32:22-30, 33:1-11, 35:1-5, इब्री 11:21**

## पाठांतर वचन

“तेव्हा तो म्हणाला, “पण त्यापेक्षा जे देवाचे वचन ऐकतात व पाळतात ते धन्य!”." लूक 11:28



लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा



## कार्य

हया आठवडी तुमचा गृहपाठ हा आहे कि मागील दोन आठवडयात तुम्ही जो विचार केला व लिहिले त्याची आठवण करावी, तुमचे स्वप्न आणि तुमचा जन्मसिध्द हक्क. त्याबद्दल पुन्हा विचार करा, परंतू हाही विचार करा कि काही गोष्टी करून तुम्ही त्या कशा नष्ट करू शकता. जर तुम्ही घरी बंडखोर असला तर त्यामूळे तुमच्या नैसर्गिक जन्महक्कावर परिणाम होईल. जर तुम्ही डॉक्टर किंवा इंजिनियर होण्याचे स्वप्न पाहीले तर तुम्ही शाळेत चांगला अभ्यास न करून ते स्वप्न नष्ट करू शकता. जर तुमच्या स्वप्नासाठी चांगल्या आरोग्याची गरज आहे तर तुम्ही सिगारेट ओढून, मादक पदार्थ किंवा दारूचे सेवन करून ते नष्ट करू शकता. तुमचे स्वप्न किंवा तुमचा जन्म सिध्द हक्क पूर्ण करण्यासाठी तुम्ही कसे जीवन जगू शकता ते लिहा.

# धडा 8 देवावर भरवसा ठेवा

**योसेफ: उत्पत्ति 37:2-11, 37:17-36, 39:1-41:13, 41:14-16, 41:28-40, 41:56-42:5, 45:1-15, 47:5, इब्री 11:22**

## पाठांतर वचन

“चांगले करण्याचा आपण कंटाळा करू नये; कारण आपण न खचलो तर यथाकाळी आपल्या पदरी पीक पडेल.” गलतीकरांस पत्र 6:9



लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा



## कार्य

हया आठवडी तुमचा गृहपाठ लोकांना क्षमा करणे आहे. आपण सर्वांनीच अयोग्य वागणूकिचा सामना केला आहे. आपण त्याबद्दल रागावतो आणि त्याचा सूड घेवू इच्छितो किंवा आपण क्षमा करून देवावर भरवसा ठेवण्याची निवड करू शकतो. हया आठवडी जेव्हा कधी तुम्ही असा विचार करता कि कोणीतरी तुम्हाला दुखावल आहे तेव्हा असा विचार करा कि ‘मी त्यांची क्षमा करतो’ तुम्हाल हे त्या व्यक्तिला जाउन म्हणायचे नाही, तुम्ही एकटे असतांना तुम्ही ते जोराने म्हणू शकता. हया मुळे जो राग तुमच्या मनात आहे त्यातून तुमची सुटका होवू शकते आणि तुम्ही पुन्हा एकदा आनंदी व्हाल. तुम्ही तुमच्या स्वर्गीय पित्या सारखे आहात कारण तो आपणा सर्वांची क्षमा करतो. जितके ज्यास्त तुम्ही लोकांची क्षमा कराल तितके तुम्ही स्वतंत्र व्हाल.

# धडा 9


# पापाला मागे सोडा

**मोशे: निर्गम 1:1-2:15, 3:1-12, 4:10-17, (7:8-13:42), 14:5-31, प्रेषितांची कृत्ये 7:20-34, इब्री 11:23-29**

## पाठांतर वचन

“म्हणून जर कोणी त्यांपासून दूर राहून स्वतःला शुद्ध करील, तर तो पवित्र केलेले, स्वामीला उपयोगी पडणारे, प्रत्येक चांगल्या कामास तयार केलेले, असे मानाचे पात्र होईल.” 2 तीमथ्याला 2:21

लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा 



## कार्य

तुमचे कार्य हे आहे की जेव्हा तुम्ही पाप करता तेव्हा काय प्रतिक्रिया देता, जसे ते लपविणे किंवा त्या बद्दल खोटे बोलणे, आणखी एक पाप. कधी कधी आपण असे म्हणून स्वतःला शिक्षा देतो कि,‘मी चांगली व्यक्ति नाही आणि मला हे किंवा ते करण्याची परवांगी नसावी.’ आणि आपण निराश होतो. परंतू सर्वात चांगली प्रतिक्रिया म्हणजे हे मान्य करणे कि आपण पाप केले आहे आणि येशूला त्या पापाची क्षमा मागणे. देवाची इच्छा नाही कि आपण आपल्या पापाबद्दल निराश व्हावे. तो तुम्हाला क्षमा करू इच्छितो, जेणे करून तुम्ही इतरांना प्रोत्साहन देण्यासाठी मोकळे व्हाल.

धडा 10

# होय तुम्ही करू शकता

**कालेब**: **गणना 13:1-3, 13:17-14:9, 14:7-24, 14:30-45**

## पाठांतर वचन

“परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.” प्रेषितांची कृत्ये 1:8

लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा





## कार्य

हया आठवडयात तुमचे कार्य देवाने तुमच्यसाठी केलेल्या पाच चांगल्या गोष्टी लिहिणे आहे. मग हया गोष्टीचा विचार करा कि तुमच्या जीवनात कोण हयाशी सहमत होईल कि हया गोष्टी चांगल्या आहेत. त्या लोकांबरोबर तुम्ही ज्यास्त वेळ घालवावा. तुम्ही त्या मित्राबरोबर अधिक वेळ कसा घालवू शकता या बद्दल विचार करा. तुमच्या कडे आधीच काही विश्वास आहे. यामूळे आपल्या विश्वासाला मदत होईल, ज्या रितीने झाडाला पाणी दिल्याने मदत होते तसे.

# धडा 11

# त्याच्या बद्दल विचार सुद्धा करू नकोस

**बलाम: गणना 22:1-6, 22:9-38, 23:13-21, 24:10-13**

## पाठांतर वचन

“मुलांनो, प्रभूमध्ये तुम्ही आपल्या आईबापांच्या आज्ञेत राहा, कारण हे योग्य आहे.” इफिसकरांस पत्र 6:1

लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा





## कार्य

हया आठवडी तुमचे कार्य हे आहे कि ज्या विरूध्द तुम्ही बंड करत आहात ते लिहा, काही तरी जे तुम्ही करू इच्छित नाही परंतू केले पाहिजे, काही तरी जे तुम्ही करू इच्छिता पण करू नये. ते गृहपाठ किंवा कार्य पूर्ण करणे, पालकांच्या इच्छेनुसार वागणे इतके साधे असू शकते. तुमच्या मनाला, तुमच्या मित्रांना आणि कुटुंबाला किंवा तुमच्या भविष्याच्या आशा आणि देवाची सेवा करण्याच्या स्वप्नाला हया मूळे होणा-या नुकसानाबद्दल विचार करा.

# धडा 12

# देवाची बाजू


**यहोशवा**: **यहोशवा 1:1-11, 2:1-21, 3:14-4:7, 4:15-18, 5:10-6:11, 6:15, 6:20-25, इब्री 11:30-31**

## पाठांतर वचन

“परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.” योहान 1:12

लपवलेल्या 6 गोष्टी शोधा.
मग, चित्र रंगवा





## कार्य

या आठवड्यात तुम्हाला विचार कार्याचा आहे कि तुम्ही या गटाचा भाग असण्यासाठी ख्रिस्ती असल्याचा नाटक करत आहात कि तुम्ही खरोखर देवावर विश्वास ठेवता. जर हि तुमची पहिली वेळ आहे किंवा तुम्हाला अनिश्चितता वाटत असेल तर, तुही तुमच्या रविवार शाळेच्या शिक्षकाला विचारू शकता कि तुम्हीयेशू वर विश्वास ठेवून देवाच्या कुटुंबात कशा परकारे सामील होऊ शकता. जर तुम्ही आधीच येशूचा स्वीकार केलेला असेल, तर या आठवड्यात तुमच्या पेक्षा वेगळ्या कोणालातरी काहीतरी चांगले बोला, जसे कि त्यांच्या कपड्यांचेकौतुक करणे किंवा ते कशा प्रकारे खेळ खेळतात त्याचे कौतुक करणे.

# धडा 13


## काहीही ठेऊ नका

**आखान: यहोशवा 6:17-19, 7:1-12, 7:20-8:7, 8:18-27**

### पाठांतर वचन

“जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील.” 1 योहानाचे 1:9


लपवलेल्या 6 गोष्टी शोधा. मग, चित्र रंगवा





### कार्य

या आठवड्यात तुमचे कार्य असे आहे कि तुम्ही देवापासून आणि इतरांपासून काय लपवत आहात त्याबद्दल लिहावे आणि तुम्ही ते का लपवत आहात हे देखील लिहावे. मग विचार करा कि ती गोष्ट तुम्हच्या कशा प्रकारे परिणाम करीत आहे. ती देवासोबत तुम्हचे सहभाग खराब करते, आणि हे चांगले नाही. परंतु, आयमध्ये घडल्या प्रमाणे, आपल्या वर्गातील लोकांना आणि आपण ज्या लोकांबरोबर येशूचे अनुसरण करीत आहोत त्या लोकांना देखील त्या गोष्टीचा त्रास होतो. काही कारणास्तव त्यांना हे कळणार नाही, कि ते तितके प्रभावी नाही, तितके आनंदी नाही, किंवा एक गट म्हणून ते जितके अनुकूल असले पाहिजे तितके राहिलेले नाही. काय करायचे आहे हे तुम्हाला माहित आहे. तुमच्या आई वडिलांकडे किंवा एखाद्या विश्वासु शिक्षक किंवा पाडकाकडे किंवा येशू कडे त्या पापाची कबूली करा. देवाची क्षमा माग आणि त्याच्या क्षमेमुळे जो बदल घडतो तो पाहा.




Heroes 1 Easy
Marathi
11911

www.LosNinosCuentan.com
pedidos@losninoscuentan.com
México: 01-800-839-1009   01-592-924-9041
Guatemala: pedidosguate@losninoscuentan.com
Venezuela: pedidosvenezuela@losninoscuentan.com

मुले महत्वपूर्ण आहेत